असुधारित प्रत

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०१५
## (सकाळी १०.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**तीन : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. १ )**

(१) **सर्वश्री सरदार तारासिंह, रुपेश म्हात्रे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, राजेश टोपे, रमेश कदम, सुनिल प्रभु, अजय चौधरी, डॉ. बालाजी किणीकर, श्री.अबु आजमी, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मु. पो. ता. भिवंडी (जि.ठाणे) येथील मालोडी-रावत्याचापाडा येथील महात्मा ज्योतीबा फुले संचलित प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेतील २५ विद्यार्थ्यांना अन्न व दुषित पाण्यातून विषबाधा होऊन कॉलरा व गॅस्ट्रोची लागण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस येणे, त्यापैकी १२ विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असणे, या आश्रम शाळेत पहिली ते दहावी या वर्गात शिकणारे सुमारे ४०० विद्यार्थी वसतीगृहात वास्तव्यास असून एका सामाजिक संस्थेने केलेल्या अन्नदानातून तसेच आश्रमशाळेतील दूषित पाणी व निकृष्ट धान्यामुळे शाळकरी मुलांना सदर लागण झाल्याचे निदर्शनास येणे, वसई रोडवरील या आश्रम शाळेत व्यवस्थापकांतर्फे देण्यात येणारी निकृष्ट अन्न व दूषित पाणी याबाबत वेळोवेळी तक्रारी करण्यात येऊनही कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे, या सर्व प्रकाराची उच्चस्तरीय समिती मार्फत सखोल चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी, व्यवस्थापक व संबंधित ठेकेदार यांच्याविरुध्द तातडीने कारवाई करण्यात न आल्यामुळे या निवासी आश्रम शाळेत वास्तव्यास असलेल्या मुलांचे आई-वडील, पालक, नातेवाईक यांचे मनात मुलांच्या जिविताबद्दल निर्माण झालेली भिती व चिंता,

या संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या बेफिकीर वतर्नाबद्दल निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

(२) **श्री.राधाकृष्ण विखे पाटील, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाने मेट्रो ३ कुलाबा ते सिप्झ हा ३३.५ कि.मी. लांबीचा मेट्रो प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उभारण्याचा घेतलेला निर्णय, सदरहू मेट्रो प्रकल्पामध्ये एकूण २७ स्थानके उभारण्यात येऊन त्यासाठी सुमारे २३,१२६ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असणे, सदरहू मेट्रो रेल्वे भुयारी असल्यामुळे प्रकल्पाच्या परिसरात येणाऱ्या अनेक इमारतींना झळ बसून मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची निर्माण झालेली शक्यता, महाराष्ट्र प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर प्रकल्पाचा आराखडा सादर करताना त्या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या इमारतींमधील रहिवाशांसाठी कोणतीही पुनवर्सन योजना तयार न करणे, तसेच त्याबाबत भविष्यात कोणती योजना राबविण्यात येणार याबाबत माहिती देण्यात न येणे, प्रकल्पामुळे इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांचे तसेच उद्योगधंद्याचे स्थलांतरण करावे लागणार असल्यामुळे शासनाने त्यासाठी केवळ रुपये ९१ कोटी इतकी अल्पशी तरतूद केल्यामुळे बाधितांच्या पुनर्वसाबाबत निर्माण झालेला प्रश्न, सदर मेट्रो प्रकल्प मार्गामध्ये बहुसंख्य मराठी भाषिक बाधित होणार असून सुमारे ६५० इमारती व १८ हजार कुटूंबावर त्याचा परिणाम होणार असल्यामुळे या कुटूंबांच्या पुनर्वसनाबाबत शासनाकडे कोणतीही योजना प्रस्तावित नसल्यामुळे तेथील लोकांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष, सदरहू प्रकल्पाचा मार्ग मुंबईतील चिराबाजार काळबादेवी अशा गजबजलेल्या मार्गावरुन न नेता अन्य मार्गावरुन नेण्याची शासनाकडे केलेली मागणी, सदर प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत शासन अथवा म.प्र.वि.प्रा. कडून कोणत्याही प्रकारचे समाधानकारक अथवा ठोस उत्तर न मिळेपर्यंत प्रकल्पाला विरोध करण्याची बाधित होणारे रहिवाशी तसेच विविध राजकीय पक्षांच्या वतीने घेण्यात येत असलेली भूमिका, या प्रकल्पामुळे मुंबईसारख्या शहरात असलेले उद्योगधंदे व रोजगाराच्या संधी बंद होण्याची भीती असल्यामुळे रोजगाराच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका."

(३) **सर्वश्री दिलीप वळसे पाटील, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, राहुल जगताप, रमेश कदम, हसन मुश्रीफ, किसन कथोरे, ॲड.राहुल कुल, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"मुंबई गोवा महामार्गावरील चरवेली, कापडगाव, झरेवाडी, (ता.जि.रत्नागिरी) येथील आंबा व काजुच्या बागा दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास वणवा लागून आग लागणे, या वणव्यात तीन गावांतील आंबा, काजुच्या बागा जळून जाणे, यामध्ये ५०० एकर जमिनीवरील आंबा व काजुच्या बागा आगीत खाक होऊन कोट्यवधी रुपयांचे प्रचंड नुकसान होणे, त्यामुळे तेथील शेतकऱ्यांवर आलेले अस्मानी संकट व त्यांचे झालेले आर्थिक नुकसान, याबाबत शासनाने या नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : शासकीय विधेयके :-**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) (क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अबू आजमी, छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१४ नापसंत करते."

(ख) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५.

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---------------------------------------------------------------

**(२)** (क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) अध्यादेश, २०१५ नापसंत करते."

(ख) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक, २०१५.

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजुर अपचलनगर साहिब (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---------------------------------------------------------------

**(३)** (क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री छगन भुजबळ, जितेंद्र आव्हाड, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, भास्कर जाधव, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१५ नापसंत करते."

(ख) सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१५.

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री धैर्यशील पाटील, सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

## अशासकीय कामकाज

## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**सहा : अशासकीय विधेयक :-**

**पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक १ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१५ - ॲड.पराग अळवणी, वि.स.स. यांचे.

**सात : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(सदरहू ठराव बॅलटद्वारा ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आले आहेत.) (क्रमांक १ ते ३)**

**(१) श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा ठराव क्र. २२२**

"राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. संजय पोतनीस, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३११**

"अलिबाग तालुक्यातील (जिल्हा रायगड) शेतकऱ्यांनी ७६ वर्षापूर्वी कुळकायदा व कसेल त्याची जमीन हा कायदा अंमलात आणण्यासाठी संपाचे नेतृत्व केलेल्या स्व. नारायण नागू पाटील यांचे चरी येथे यथोचित स्मारक व्हावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) डॉ.सतिश पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८१**

"नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ अशी शेतीची परिस्थिती असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भुमिका घ्यावी अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १२ मार्च, २०१५

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.